# *रम्य ते बालपण*

व्यास क्रिएशन्सच्या ऑनलाईन निबंध स्पर्धेच्या निमित्ताने आज खूप दिवसांनी (?) लिहायला मिळालं. खरंतर निबंध लिखाणाची सवय ही शाळेनंतरच सुटली होती आणि आता तीदेखील बालपणाच्या आठवणीत एक 'आठवण' बनून राहिलीय. माझ्या मते, बालपण म्हणजे फक्त दहावीपर्यंतचेच जीवन ! कारण, दहावीनंतर कॉलेजमध्ये गेल्यावर वेध लागतात ते तरुणाईचे! इथंचे आपलं बालपण संपतं आणि आपण लहानाचे मोठे होतो.

माझं बालपण हे इतरांसारखंच होतं. दिवसभर मजा-मस्ती करा, उड्या मारा, धडपडा, भांडणं करा आणि संध्याकाळी न चुकता अभ्यास करा! एकदम व्यवस्थित चौकटीतलं आयुष्य होतं ते; पण कसलीही बंधनं नसलेलं ! खरंच लहानपणी केलेली मस्ती, शिक्षकांची, शेजाऱ्यांची काढलेली खोड आणि त्यानंतर आईचा मिळालेला धपाटा आज खूप आठवतोय. आता मोठे झाल्यावर तशी मस्ती करायला मिळत नाही आणि आईचा मारही नाही. लहानपणी वाटायचं की आपण कधी एकदाचे मोठे होतोय, मोठ्या माणसांसारखा पैसा कमावतोय, पण आज मोठे झाल्यावर करिअरच्या मार्गी लागल्यावर ते बालपणीचे दिवस आठवतात, न विसरता येणारे ते क्षण आठवतात.

माझ्या लहानपणी आम्ही सर्व मित्रमैत्रिणी दुपारच्या वेळी चाळीत नुसता धिंगाणा घालायचो. लपाछपी, डोंगर का पाणी ?, विषामृत, लगोरी, सोनसाखळी असे कितीतरी खेळ खेळण्यात आमचा दिवस निघून जायचा. लपाछपीत तर एकमेकांना शोधण्यासाठी या गल्लीतून त्या गल्लीत आमची नुसती पळापळ असायची. त्याकाळी लहान मुलांसाठी सुरक्षित - असुरक्षित असं काही नव्हतंच मुळी! आणि जरी कुणी आलंच आम्हाला पळवायला तर त्याची काय बिशाद होती आमच्या टोळीपुढे! असंच एकदा आम्ही सर्वांनी मिळून एका अनोळख्या माणसाचा चांगलाच 'कपाळमोक्ष' केला होता. पण नंतर कळलं की तो माणूस म्हणजे आमच्या शेजारच्या काकांचा गावावरुन आलेला चुलतभाऊ होता. काय ओरडा पडला म्हणून सांगू त्यावेळी आम्हांला! पण तो माणूस कुख्यात गुंडासारखा दिसत होता त्यात आमची तरी काय चूक? असो. आमच्या धिंगाण्यामुळे मात्र आमच्या सर्वांच्या 'मातोश्रीं'ची दुपारची झोपमोड व्हायची. जास्तच गलका झाला तर, एकेकाला छडीने, झाडूने मारत-मारत आमच्या मातोश्री आम्हांला घरी न्यायच्या. पण आम्ही गप्प बसणारे थोडेच होतो? घरात बसूनच आम्ही मोठमोठ्याने रडायला सुरुवात करायचो. एकाची सुरुवात झाली तर दुसऱ्याने त्याच्या जोडीला 'ताल' धरलाच म्हणून समजा. मग काय, शेवटी विजय आमच्याच बच्चापार्टीचा! मग पुन्हा मैदानात उतरायला आम्ही तयार!

हल्ली मात्र चाळींमध्ये दुपारच्या वेळी खूप शांतता असते. आधीसारखी सगळ्यांच्याच आईची झोपमोड होत नाही. कारण, आता आम्ही सर्वजण 'मोठे' झालोत ना! आपापल्या कामाला लागलो, पैसा कमवण्याच्या मार्गी लागलो. त्यामुळे ते आमचे खेळ भूतकाळातच राहिले. त्या गल्ल्यां-गल्ल्यांतून आज

मोकळेपणाने वावरता येत नाही. आम्ही बालमित्र-मैत्रिणी आजही रोज भेटतो; पण ते फक्त फेसबुकवरच! हाय-हॅलो, कशी आहेस, जेवलीस? यापलीकडे जास्त 'चॅटिंग' होतच नाही. फेसबुकमुळे जग जवळ आले असे लोक म्हणतात. पण निदान माझ्यासाठी तरी माझे ते बालपणीचे मित्र-मैत्रिणी दुरावले. सुट्टीच्या दिवशी आपापल्या घरी असल्यावर देखील आम्ही फेसबुकवरुनच चॅटिंग करतो, पण लहानपणी पायऱ्यांवर बसून मारलेल्या गप्पा, एकमेकांना मिळवणं, उगीच कळ काढणं मात्र आता होत नाही. बालपणीच्या त्या गप्पा, आमचे ते खेळ बालपणीतच राहिले.

लहानपणी इतरांसारखा मलाही शाळेत जायला खूप कंटाळा यायचा. घरी एखादं कार्य निघालं मुख्यतः मार्गशीर्षातले गुरुवार की माझ्या पोटात मुद्दामहून दुखलंच म्हणून समजा! शाळा चुकवण्यासाठी कितीतरी कारणं सांगितली असतील मी? हे माझं मलाच ठाऊक! खरंच, एवढी कारणे मला कशी काय सुचायची देवजाणे! आमच्या पप्पांना मात्र माझं सोंग चांगलंच ठाऊक होतं. ते लहानपणी मला शाळेत जाण्यासाठी हातावर एक रुपया टेकवायचे. त्यावेळी त्या एक रुपयाचा किती अभिमान वाटायचा मला! त्या एक रुपयाचं काय - काय खाऊ असं व्हायचं. पण आज मात्र ऑफीसला जायला कधी कंटाळा आला तर पप्पा आधीसारखे 'एक रुपया' हातावर का ठेवत नाहीत? आज पगारात एका अंकापुढे जास्त शून्य लागले असले तरी लहानपणीच्या त्या एक रुपयाचा हावरेपणा का मनातून जात नाही?

माझी शाळा आमच्या घरापासून बरोबर आठ मिनिटांवर होती. सकाळी ७.१०च्या शाळेला आम्ही सात वाजताच निघायचो. पाच मिनिटे जरी उशिर झालाच निघायला तर पहिला तास माझा 'वर्गाबाहेर ' व्हायचा. शिक्षा झाली म्हणून मला काही वाईट वाटायचे नाही. कारण नेहमी सोबतीला माझ्यासारखे 'लेटकमर्स' असायचेच. मी एकटे शिक्षा भोगत नाही ना याचेच मला समाधान वाटायचे. लहानपणी शाळेत प्रत्येक स्पर्धेत मी भाग घ्यायचे मग ती कुठलीही असो. पहिल्या नंबरसाठी आम्हां मित्र - मैत्रिणींत चढाओढ असायची. मी हरले म्हणून रुसूनही बसायचे, जिंकणाऱ्या मैत्रिणीचा सॉलिड रागही यायचा; पण तो केवळ त्याच दिवसापुरता. बालपणीची ती स्पर्धा आजच्यासारखी जीवघेणी नव्हती. अपयश आले म्हणून आत्महत्या करणाऱ्यांपैकी आम्ही नव्हतोच मुळी! उलट, आम्ही हरलो, आमची मैत्रिण जिंकली यामुळे पुढच्यावेळी आम्हांला आणखी हुरुप यायचा. आम्ही नव्याने सुरुवात करायचो. आज मात्र तशी स्पर्धा नाही. हल्लीच्या स्पर्धेत सर्व नुसते धावत आहेत; जिंकण्यासाठी नाही तर स्वतःच्या अस्तित्वासाठी!! आमच्या लहानपणी स्पर्धेत, खेळात, परिक्षेत फक्त दोनच गोष्टी होत्या; जिंकणं आणि हरणं! आज मात्र करिअरच्या 'गोंडस' नावाखाली आपल्याच मित्र-मैत्रिणींशी एक युध्द सुरु आहे. मग तो मित्र किंवा मैत्रिण कितीही का ना जिवाभावाची असो! पण मला एक आनंद आहे की माझं बालपण कधीही आजसारख्या खोट्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत हरवलं नाही.

लहानपणी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला आम्हां मुलांना एक वेगळंच स्फुरण चढायचं. सकाळी लवकर उठून आम्ही शाळेत झेंडावंदनाला पळायचो. राष्ट्रगीत, राष्ट्रपरगीतं जोरजोराने बोलायचो. अंगात आहे तेवढी ताकद वापरुन 'भारतमाता की जय, वंदे मातरम्'च्या घोषणा द्यायचो. जसे काय

आम्हीच मोठे देशभक्त! रात्रभर जागून मी भाषण पाठ करायचे. झेंडावंदन झाल्यावर काढण्यात आलेल्या प्रभातफेरीमध्ये आमचा वर्ग नेहमीच वरचढ असायचा. लेझीममध्ये तर आम्ही कितीतरी प्रकार सादर करायचो. पण आज मोठे झाल्यावर राष्ट्रगीत मला फक्त थिएटरमध्येच ऐकू यायला लागलंय. राष्ट्रगीत संपल्यावर 'भारतमाता की जय' घोषणा का लहानपणीसारखी आवेशात तोंडातून बाहेर पडत नाही? त्या घोषणेबरोबरच माझं ते शाळेतलं राष्ट्रप्रेम पण बालपणीच्या आठवणींत विरुन गेलंय का? आज स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी 'आय लव्ह माय इंडिया, हॅपी इंडीपेन्डस् डे, हॅपी रिपब्लिक डे'चे मॅसेज न चुकता मोबाईलवर पाठविले जातात. फेसबुकवरुन एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात; 'इन अॅडव्हान्स' हा! या सुट्टीच्या दिवशी काय करायचं याचं प्लॅनिंग आठवडाभर आधीच केलं जातं. पण लहानपणी जसं सकाळी लवकर उठून, छातीवर अभिमानाने झेंड्याचा बॅच लावून मिरवत झेंडावंदन करायचं का विसरुन गेलेय मी? मोठे झाले म्हणून का?

लहानपणी आम्ही उन्हाळी सुट्टीत कापडांपासून, आईस्क्रीमच्या काड्यांपासून छोटीशी बाहुली बनवायचो. शिंप्याकडे जाऊन त्याच्याकडचे साडीचे कापलेले फॉल जमा करुन आणायचो. त्या चिंध्या म्हणजे आमच्या बाहुलीच्या साड्या बरं का! सुंदर साडी नेसून, मण्यांचे दागिने घालून नटलेल्या त्या आमच्या बाहुलीपुढे 'बार्बी डॉल' पण फिकी पडेल. आमच्या बाहुलीच्या लग्नात आम्ही जेवणाची पंगतही उठवायचो. मेनू असायचा; पारले बिस्कीट, नळ्या, काजूच्या आकाराची नमकीन बिस्कीटे, लिमलेटच्या आणि श्रीखंडाच्या वड्या! आणि हो, शीतपेय म्हणून पंचवीस पैशाला भेटणारी छोटी पेप्सी, एक नारंगी आणि एक पिवळी. आमच्या त्या दिवसांत हायजेनिक - अनहायजेनिकसारखा प्रकारच नव्हता. पण आज मात्र साधी 'पाणीपुरी' खातानाही दहावेळा विचार करावा लागतो. आमच्या लहानपणी चाळीत फक्त आमच्याकडे टि.व्ही. होता आणि त्यावेळी काही आजसारख्या 'सास-बहू छाप' सुमार मालिका नव्हत्या. गोट्या, दे धमाल, बोक्या सातबंडे, नायकसारख्या मालिका आम्ही न चुकता पाहायचो.

आता मोठे झाल्यावर खूप काही गोष्टी बदलल्या.....खूप गोष्टी! शाळेतल्या त्या मधल्या सुट्टीची जागा ऑफीसमधल्या लंच ब्रेकने घेतलीय, शाळेत नेहमीच अपूर्ण असलेला गृहपाठ आता ऑफीसमधला प्रेझेंटेशन बनून राहिलाय! आज बालपणीचं एक गाणं खूप आठवतंय; 'सांग सांग भोलानाथ...' आता त्या गाण्यात थोडासा बदल करुन म्हणावसं वाटतंय की... 'सांग सांग भोलानाथ...बालपणीचे ते दिवस येतील का रे पुन्हा?.....'

असंच एक ऑनलाईन वाचलेलं....

''खरंच आता असं वाटतंय की आपण उगाचच मोठे झालो,
रम्य ते बालपण सोडून उगाच तारुण्याच्या कवेत आलो....!''